जैन

# उद्योग जगत

व्यापार-उद्योग यांच्याशी निगडीत सर्व घटकांचे विश्लेषण करणारे दर्जेदार मासिक


वर्ष -१ ले    अंक - २ रा    ऑक्टोंबर - २०१३    किंमत - १५

No. Desk VII Home N.P.S.R. 34/2013
Tital Code - MAHMAR42467



संस्थापक - संपादक
श्री. भरत अलगौंडर

मार्गदर्शक -
श्री. जिनरत्न रोटे, कोल्हापूर
श्री. अनिल पाटील, कोल्हापूर

प्रसिध्दी व जाहीरात प्रमुख -
श्री. महावीर चौगुले
मोबा. ९८२२१४१३१२



सभासद वर्गणी -
वार्षिक वर्गणी - १५०/-

प्रकाशन तारीख -
प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला



संपर्काचा पत्ता -
'सर्वज्ञ-सिद्धी'
मु. नेज पो. बाहुबली
ता. हातकणंगले जि. कोल्हापूर
मोबा. ९४२२७४१६९५
९४२२७४१६८६
Email- udyog.jagat1008@gmail.com




जागतिक अहिंसा दिन



मा. श्री. भवरलालजी जैन
संस्थापक : जैन इरिगेशन, जळगाव


हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक- श्री. भरत कलगोंडा अलगौंडर यांनी सुवर्ण मुद्रणालय, सदर बझार हौसिंग सोसायटी, ब्लॉक नं.५ ई वॉर्ड, कोल्हापूर येथे छापूक मु. नेज, पो. बाहुबली, ता. हातकणंगले जि. कोल्हापूर- ४१६११० महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले.

## अंतरंग

१. संपादकीय
२. भूमिपुत्र भवरलाल जैन
३. खरेदी-विक्री करताना व्यापारी बंधूंनी इकडे लक्ष द्यावे.
४. ट्रेडमार्क - आधुनिक व्यापाराचा ट्रेन्ड
५. हृदय विकाराच्या झटक्यातून बाहेर पडताना
६. स्थूलता - अनावश्यक मेदसंजय व उपाय
७. उद्योगांपुढील समस्या, त्यावरील उपाय व उद्योजकांची कर्तव्ये
८. एफएमपी- गुंतवणूकीचा चांगला पर्याय
९. ग्राहकाला आपलेसे कसे कराल?

❊ या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
❊ कोल्हापूर न्यायालयीन कक्षेत.

## संपादकीय...

भारतीय शेअर बाजार व भारताची आर्थिक स्थिती अनेक हेलकावे खात होती तेव्हा डॉ. राघुराम राजन हे भारतीय रिझर्व बँकेचे गर्व्हनर झाले आणि शेअर बाजाराची अपेक्षा उंचावली. रुपयाला सावरण्याची व बाजाराला तेजीची आस लागून राहिली आहे. काही अंशी या दोन्ही अपेक्षेमध्ये डॉ. राजन यशस्वी झाल्याचे दिसतात. जेव्हा डॉ. राजन पदावर आले तेव्हा डॉलरच्या तुलनेत रुपयाची किंमत ६८.६० इतकी होती सप्टेंबरच्या शेवटच्या अठवड्यात ६२-६९ पर्यंत सावरली आहे. काही आर्थिक विश्लेषकांच्या मते डॉ. राजन यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे कदाचित येणाऱ्या काळात डॉलरच्या तुलनेत रुपया ६० किंवा त्याच्या खाली येवू शकतो. आणि बाजाराची स्थिती देखील समाधानकारक असू शकते.

डॉ. राजन पदावर येण्यापूर्वी रुपया अशिया महाद्विपामध्ये अन्य चलनांच्या तुलनेत सर्वात वाईट स्थितीमध्ये होता. पण डॉ. राजन यांनी पदभार सांभाळल्यानंतर सातच दिवसात रुपया मजबूतीकडे प्रयाण करु लागला आकडे सांगतात की बाजार देखील मुसंडी मारु लागला आहे.

आज अर्थव्यवस्था स्थिर असणे गरजेचे आहे. कारण रुपयाच्या अवमूल्यनामुळे सामान्य मानवी जीवनावर त्याचा जबरदस्त परिणाम होत आहे. सर्वात मोठा प्रभाव हा इंधन दरवाढीमुळे पडताना दिसतो आणि अर्थिक गणितच कोलमडते. त्यामुळे सामान्य जनतेपासून उद्योगांपर्यत सर्वांचे लक्ष डॉ. राजन यांच्या आगामी निर्णयांकडे लागून आहे.

# भूमिपुत्र भवरलालजी जैन

किनारा कधीही वादळांची पर्वा करत नसतो, तो असंख्य वादळांचे धक्के सहन करुन सागराचे रक्षण करीत असतो. त्याचप्रमाणे आपल्या आयुष्यात येणाऱ्या वादळांची तमा न बाळगता–पर्वा न करता भारतातला शेतकरी 'सुखाने' जगाला पाहिजे आणि भारतीय शेती जगची अन्नदात्री बनली पाहिजे ह्या परमोच्च सामाजिक व राष्ट्रहीताच्या प्रेरणेने प्रेरित असलेले जैन इरिगेशनचे संस्थापक श्री. भवरलालजी जैन होय.

श्री. भवरलालजी जैन एक शेतकरी कुटुंबामध्ये जन्मले खरे. पण त्यांनी पाहिलेली स्वप्ने ही आकाशाला गवसणी घालणारीच होती. अत्यंत कुशाग्र बुद्धीचे धनी श्री. जैन यांनी कॉमर्स आणि लॉ ची डिग्री संपादन केली. त्यानंतर महाराष्ट्र शासनातील क्लास वनच्या प्रशासकीय पदावर ही आपली चमक दाखविली. पण नेहमीच शेतकऱ्यांच्या हितासाठी विचार करणारे त्यांचे मन शेतीपूरक व्यवसायाकडे वळाले आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या–इरिगेशन कंपनीची मुहूर्तमेढ रोवली. ती कंपनी म्हणजेच 'जैन इरिगेशन' होय. श्री. जैन यांनी आपल्या कामाची व्याप्ती शेतीपूरक सर्व घटकांपर्यंत वाढवली. पाईप, ठिबक सिंचन, शेती उपयोगी अवजारे, बी–बियाणे, रोपे आदि अनेक क्षेत्रांमध्ये जैन इरिगेशनची व्याप्ती त्यांनी आपल्या कौशल्याच्या बळावर वाढविली. या कामामध्ये अनेक अडचणी आल्या. पण अथक परिश्रम, सकारात्मक दृष्टिकोन, प्रत्यक्ष अनुभव आणि प्रबळ आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी सर्व अडचणींवर मात केली आणि उद्योग क्षेत्रातील एका मागून एक शिखरं सर करायला सुरुवात केली.

कंपनीची मुर्हूर्तमेढ जळगाव (महाराष्ट्र) मध्ये झाली असली तरी गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश अशा अनेक राज्यांमध्ये कंपनीचे औद्योगिक जाळे पसरले आहे. भारतातील विविध राज्यांसोबत विदेशातही अनेक ठिकाणी जैन इरिगेशनचे कार्य जोमाने सुरु आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया आदि देशांमध्ये श्री. जैन यांनी कंपनीचा विस्तार केला आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या या कंपनीसोबत लाखो कामगार व कोट्यावधी शेतकऱ्यांची नाळ जुळली आहेच शिवाय त्यांचे जीवनामन उंचावले आहे.

आज भारतभरातील शेतकरी केळीचे पीक घेण्यासाठी 'जैन टिश्यू कल्चर्ड केळी' ची रोपेच वापरतात. पाण्याचा योग्य व समतोल वापर शेतकऱ्यांनी करावा यासाठी ठिबक सिंचन संस्कृती वाढवायला व रुजवायला त्यांनी सुरुवात केली. शेतकऱ्यांना प्रेरणा दिली. वाया जाणाऱ्या सौर उर्जेचा वापर करण्यासाठी सौर पथ दिवे, जैन सोलर ची उत्पादने बाजारात आणली. जनमानसामध्ये विश्वासू ब्रँड म्हणून लोकांनी या उत्पादनांना देखील आपलस केल.

शेती हाच श्री. जैन यांच्या व्यवसायाचा पाया आहे. त्यामुळे ते स्वत: आजही शेती पाहणी करतात. एक हजार एकर शेतीमध्ये विविध संशोधन सुरु आहेत. ते प्रत्यक्ष त्यांचे निरीक्षण करतात. अनुत्पादक शेतीची सुधारणा करण्याकडे त्यांचे विशेष लक्ष आहे. माती आणि पाणी संवर्धनासाठी त्यांचे जीवन वाहिलेले आहे असे म्हटले तर वावगे ठरु नये गेल्या चार वर्षात विभिन्न

**(पान नं. १० वर)**

**अ) बाभूळ (बब्बुल) :-** बाभळीची साल व शेंगा यासाठी वापरतात. सालीचा काढा ४० ते ८० मिली घेतल्यास मेदाचे विलयन होते. शेंगांचे चूर्ण १ ते ३ ग्रॅम या मात्रेमध्ये पाण्यासोबत घेतल्यास चिकटून बसलेले चरबीचे कण बाहेर काढण्यास मदत होते.

**आ) खैर(खदीर) :-** याची साल व सार (कात) औषधात वापरतात. याच्या काढ्याने कफ व मेद कमी होतो. मुखातील चिकटा नष्ट होतो. रसवहस्त्रोतसांचा संकोच होऊन आमाशयातील कफ-पित्ताचे व पक्वाशयातील क्लेदाचे शोषण होऊन शरीरशैथिल्य दूर होते.

**इ) कुटकी :-** याचे भौमिक काण्ड औषधात वापरतात. ते कडू रसाचे व शुष्क गुणाचे असते. याच्या काढयाने स्त्रोतोरोध दूर होऊन दोषसंघात भेदन व मलभेदन होते व मलावाटे दोष शरीराबाहेर टाकले जातात. मलभेदन होताना पक्वाशयात शूल उत्पन्न होतो म्हणून सुंठ, बडिशेप यांसोबत काढा करुन द्यावा. बाजारात मिळणारी कुटकी बहुधा भेसळयुक्त मिळते त्यामुळे त्याचे विरेचन कार्य दिसून येत नाही.

**ई) हिरडा (हरितकी) :-** कठीण मगज असलेली व पृष्ठभागावर पाच पन्हाळीसारख्या उभ्या रेषा असलेली फळे औषधात वापरतात. याच्या कोवळ्या फळांना बाळहिरडे म्हणतात. बाळहिरडे चावून खाल्लयास अग्निदीपन होऊन आमपाचन होते कषाय रसाची द्रव्ये स्तंभन कार्य करणारी असतात परंतु हिरडा याला अपवाद असून याचे चूर्ण वापरल्यास पुरिषाचे (मळाचे) पाचन होऊन अधोमार्गाने शिथील व द्रवमल बाहेर पडतो. हिरडा वेगवेगळ्या ऋतूमध्ये गुळ, सुंठ, मध, पिंपळी, सैंधव, साखर यासारख्या वेगवेगळ्या अनुपानासह सेवन करावा लागतो. सर्व ऋतूमध्ये हिरडा घेणे सोपे जावे म्हणून त्यामध्ये आवळा व बेहडा घालून त्रिफळा चूर्ण बनवले जाते.

**फ) नागरमोंथा (मुस्ता) :-** याचे बाहेरुन काळे व आतून धरकट अथवा पांढऱ्या रंगाचे सुगंधी कंद येतात हे कंद औषधामध्ये वापरतात. याच्या काढ्याने तृष्णाशमन होते. विरेचक द्रव्यासोबत याचा काढा घेतल्यास मेदोवह स्त्रोतसाचे शोधन होते व मूत्रमार्गे दोष बाहेर काढून टाकले जातात.

वरील प्रमाणे आहार-विहार व ओषध योजना केल्यानंतर महिन्याला किमान १ ते २ किलो वजन कमी होऊ शकते. मनोनिग्रहानुसार वर्षभरामध्ये आपल्याला हवे तसे सुडौल शरीर आपण बनवू शकता, मात्र पुन्हा चरबी साठून वजन वाढू नये यासाठी नियंत्रित आहार व निरंतन व्यायाम सुरु ठेवणे गरजेचे आहे.

---

**(पान नं. २ वरून)**

जाती-वर्गातील दीड लाख झाडे लावण्याचे आव्हानात्मक कार्य सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिने केले आहे. श्री. जैन स्वत: शिक्षणाला अधिक महत्त्व देतात. त्यामुळेच ते सामाजिक बांधिलकीने शैक्षणिक कार्यांना सहकार्य करतात. शिवाय वैद्यकिय, सांस्कृतिक आणि समाजविधायक कामांमध्ये अधिक रस आहे. त्यांचे कर्तृत्व आणि सुधारणावादी विचार यांमुळे भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकारच्या अनेक लोकोपयोगी समितींचे ते सदस्य आहेत.

श्री. जैन स्वत: एक विचारवंत आहे. त्यांचे स्वत:चे काही आदर्श आहेत. ''शेतकऱ्याला आर्थिक स्थैर्य मिळवून देणे व आधुनिक पद्धतीने शेतीतून प्रगती साधने'' हे त्यांच्या दैनंदिन जीवनाचे ध्येय असते. त्यांच्या जीवनामध्ये तीन शब्दांना सर्वोपरी महत्त्व आहे. Land, Library and Laboratory; परंपरा आणि आधुनिकतेचा संगम साधण्यासाठी सतत कार्यमग्न राहणे हा त्यांचा छंद आहे. शेती, शेतीकरणे व शेतकरी या गोष्टीवर त्यांना अत्यंत विश्वास आहे म्हणूनच त्यांना सर्वजण प्रेमाने 'भूमिपुत्र' (Son of the soil) म्हणतात.